# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. पुणे

४ ब, बी. जे. रोड, पुणे ४११००१

## जाहिर निविदा सुचना

पुणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक मर्या. पुणे जि. पुणे यांचेमार्फत खालील कामासाठी इच्छुक पंजीकृत, अधिकृत मान्यताप्राप्त ठेकेदार यांच्याकडुन सिलबंद व्दिलिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम सर्व करासह | ०.५% बयाणा रक्कम टेंडर भरतेवेळी | २% अनामत रक्कम | निविदा मुल्य | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक मर्या. पुणे यांचे अंतर्गत मौजे शिरुर येथील जागा त्यासी सि.स.नं. १९६९/१ या ठिकाणी नविन इमारतीचे बांधकाम करणे | रु ३,४४,७९,१८३/- | रु १,७२,३९६/- | रु ६,८९,५८४/- | रु ५,०००/- | १८ महिने |

| अ.क्र. | तपशील | सुरु दिनांक | वेळ | समाप्त दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा फॉर्म विक्री (कार्यालयीन वेळेत) | २७/१२/२०२४ | सकाळी ११.०० वा. | ०४/०१/२०२५ | दुपारी ४.०० वा. |
| २ | निविदा फॉर्म स्विकारणे (कार्यालयीन वेळेत) | ३१/१२/२०२४ | सकाळी ११.०० वा. | ०७/०१/२०२५ | दुपारी ४.०० वा. |
| ३ | निविदा पुर्व बैठक | ०३/०१/२०२५ | दुपारी ३.०० वा. | - | - |
| ४ | तांत्रिक लिफाफा उघडणे | ०८/०१/२०२५ | दुपारी ३.०० वा. | - | - |
| ५ | वित्तीय लिफाफा उघडणे (फायनान्सीअल बीड) | १३/०१/२०२५ | दुपारी ३.०० वा. | - | - |

निविदा फॉर्म विकत घेतल्यानंतर त्यामध्ये नमुद केल्यानुसार कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. सदर कामाचा तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर वित्तीय निविदा उघडण्यात येतील.

PUNE DISTRICT CENTRAL CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE

## पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. पुणे

मुख्यकचेरी ४ ब, बी. जे. रोड पुणे ४११००१

कामाचे नाव – पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. पुणे यांचे अंतर्गत मौजे घोडनदी ता. शिरुर येथील जागा त्यासी सि.स.नं. १९६९/१ या ठिकाणी नविन इमारत बांधकाम करणे.

### टेंडर अटी व शर्ती

१. निविदा सादर करतेवेळी बयाणा रक्कम रु १,७२,३९६/– डि.डि. व्दारे भरले शिवाय निविदा स्विकारली जागार नाही.

२. निविदेमध्ये नमुद करावयाचे दर शासनाचे सर्व प्रकारचे दर लक्षात घेवुन नमुद करावे.

३. लिफाफा क्र. १ मध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

i) सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणी प्रमाणपत्र

ii) पॅन कार्ड, जी.एस.टी. प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत

iii) मागील ३ वर्षाचे आयटी रिटर्न सादर करणे बंधनकारक राहील.

iv) तसेच या स्वरुपातील कामे केल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र किंवा पुर्णत्वाचा दाखला इ. कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

| | |
|---|---|
| कंत्राटदाराने पुर्ण केलेल्या कामाची किमान किंमत, समतुल्य मुल्याची, देय कामांच्या किमतीनुसार (प्रचलीत दराने) गेल्या ५ वर्षात | अ) तीन तत्सम कामे ज्यांची अंदाजीत किंमत निविदा मागवलेल्या अंदाजीत रकमेच्या ४०% पेक्षा कमी नसावी.<br>किंवा<br>ब) दोन तत्सम कामे ज्यांची अंदाजीत किंमत निविदा मागवलेल्या अंदाजीत रकमेच्या ५०% पेक्षा कमी नसावी.<br>किंवा<br>क) कामाची अशीच पद्धत ज्यांची अंदाजीत किंमत निविदा मागवलेल्या अंदाजीत रकमेच्या ८०% पेक्षा कमी नसावी. |

v) सदर कामासाठी निविदापुर्व बैठकीसाठी उपस्थित राहणे बंधणकारक राहील. सदरच्या बैठकीसाठी उपस्थित न राहील्यास निविदा ग्राह्य / स्विकारली जाणार नाही याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

vi) सदर काम कसे स्वरुपाचे करावयाचे आहे त्याबाबत स्थळपहाणी दाखला बँकेमार्फत घेवुन निवेदेसोबत सादर करणे बंधणकारक राहील.

vii) सदर कामासाठी कोणत्या प्रकारचे Technical Person उपलब्ध असणार आहेत याबाबतची कागदपत्रे सादर करणे बंधणकारक राहील.

४. निविदा मंजुर झाल्याचे कळविले नंतर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशानुसार त्यांनी दिलेल्या मुदतीत योग्य त्या रकमेच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल व २% अनामत रक्कम रोखीने बँकेमध्ये जमा करावी लागणार आहे.

PUNE DISTRICT CENTRAL CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE

५. अंतिम बिलातुन ५% अनामत रक्कम कपात केली जाईल.

६. कराररनाम्यात नमुद केल्याप्रमाणे काम सुरु न केल्यास किंवा काम अर्धवट सोडल्यास ठेकेदाराचे बयाणा अनामत रक्कम जप्त केली जाईल व काम दुसऱ्या ठेकेदाराकडुन करुन घेण्यात येईल.

७. सदर कामाची निविदा मंजुर झालेनंतर बँकेमार्फत वेळोवेळी कामाचे आदेश येतील त्या वेळेस काम पुर्ण करावयाचे आहे.

८. सदरचे काम अंदाजपत्रकानुसार पुर्ण करावयाचे आहे. झालेल्या कामाचे बिल काम पुर्ण केल्यानंतर आयकर व सेस व वेमा तसेच इतर कर वजा करुन शिल्लक रक्कम आदा केली जाईल.

९. वरील कामावर बँकेमार्फत नेमुन देण्यात आलेले कन्सलटंट आर्किटेक्ट / बँक इंजिनिअर अथवा घोडनदी शाखा अधिकरी यांना देखरेख करण्याचा अधिकार राहील. / त्यांनी दिलेल्या सुचना अंमलात आणाव्या लागतील.

१०. निविदा कामकाजा संदर्भात म्हणजेच निविदा सादर करणे, निविदा संदर्भातील कामगदपत्रे सादर करणे, निविदा उघडणे, कामाचा आदेश घेणे, करारनामा करुन घेणे - देणे, बिल सादर करणे, धनादेश स्विकारणे, इत्यादीसाठी ठेकेदारास त्यांचे प्रतिनिधी नेमायचे असल्यास रु ५००/- स्टॅम्पपेपरवर सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रतिज्ञापत्र किंवा नोटराईज्ड ॲथोरीटी लेटर सादर करणे आवश्यक राहील.

११. संस्था किंवा संस्थेच्या अधिन किंवा संस्थेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदेमध्ये संस्थेच्या कोणत्याही संचालकांचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा भागीदारी नाही याबाबतचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

१२. मा. आयुक्त सो. भिविष्य निर्वाह निधी यांचे पत्र जा.क्र. MH/PF/306960/CIR/IV/2721 दि.१६.०३.२०१५ नुसार ठेकेदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे खाते उघडणे बंधणकारक आहे व सदर कर्मचाऱ्यांचे खात्यावर दरमहा २५.६१ टक्के दराने रक्कम भरणे बंधनकारक आहे. सबब प्रत्येक कर्मचाऱ्याचे हजेरी रजिस्टर, वेतन रजिस्टर ठेवणे बंधनकारक आहे व त्यानुसार कर्मचाऱ्यांना आदा केलेले वेतन रजिस्टरच्या व कर्मचाऱ्यांच्या ई.पी.एफ नंबर काढुन त्यांच्या झेरॉक्स प्रती बिलाला जोडणे बंधनकारक आहे. ठेकेदाराने बिल सादर करताना कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम व फंड कार्यालयाकडे भरलेली रक्कम यांच्या सत्य प्रती सादर करणे आवश्यक राहील.

१३.बंद लिफाफा मध्ये सादर केलेली कागदपत्रे ही खरी असल्याबाबतचे सत्यप्रतिज्ञापत्र रु ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर सादर करणे बंधनकारक राहील.

१४. निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
पुणे जिल्हा मध्य. सह. बँक मर्या. पुणे

जाहिरात व निविदेमध्ये नमुद केलेल्या अटी / शर्ती मी वाचल्या असुन त्या मला मान्य असुन माझ्यावर त्या बंधनकारक आहेत.

**ठेकेदार सही व शिक्का**